अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# समाजमनाचे भान जपणारी होळी

शिमगा म्हणजेच होळी! हिंदू कालगणनेप्रमाणे येणाऱ्या पंचांगातला हा तसा शेवटचा सण. कदाचित म्हणूनच या शेवटच्या सणाचा उत्सव साजरा करताना अधिक मुक्तपणा दिसून येता फारसे व्रत वैकल्य उपास तापास नसलेला हा सण अन्य सणांपेक्षा वेगळ्या पध्दतीचा वाटतो. नीतीनियम थोडे बाजूला ठेवून एकमेकांच्या नावाने केला जाणारा हा शिमगा कदाचित एकमेकांच्या मनातील मळमळ बाहेर काढत असेल.परंतु यानिमित्ताने होणारे काही शब्दप्रयोग होळी किंवा शिमग्याचे लक्षण मानले जातात.परंतु आता बदलत्या काळाप्रमाणे हा शिमगा किंवा होळीचा सणही बदलत चालला आहे. देशभरामध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातसुध्दा वेगवेगळ्या भागामध्ये होळी सण तिथल्या रीतीरिवाजाप्रमाणे किंवा चालीरीतींप्रमाणे साजरा होतो. विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा याठिकाणी होळी थोड्याफार फरकाने सारखीच साजरी होते. प्रामुख्याने कोकणामध्ये असलेली या सणाची विशेषता कालानुरुप आधुनिक होताना दिसते. चाकरमानी मुंबईकर आवर्जून या सणासाठी गावी जातो.अनेकांच्या घरात तर तो काही एखाद्या कुलाचाराप्रमाणे पाळला जातो. त्यामागची श्रध्दा आणि गावदेवीची कृपा अशा भक्तीभावाने होळीचा सण कोकणात साजरा होतो. अर्थातच यानिमित्ताने भांग किंवा नशाबाजीचा अतिरेकही पहायला मिळतो.खरे तर सणांचा मूळ हेतू लक्षात घेतला पाहिजे. आम्ही ज्या ज्यावेळेला सणांविषयी लिहितो त्यावेळेला सण हे सामाजिक भान लक्षात घेऊन निर्माण केले गेले आहेत असे सांगत असतो. सणाचा आणि मानवी मनाचा मेळ घालण्याचा प्रयत्न त्यातून केला गेला आहे.कोणत्याही समाजजीवनाला सभ्यपणाची अनुशासनाची चौकट आवश्यक असते. प्राचीन काळापासून ही चौकट धार्मिक अंगाने निर्माण केली गेली. पूर्वीच्या काळी राजे महाराज्यांच्या कायद्यापेक्षाही जरा धार्मिक अनुशासनाला एक वेगळेच महत्त्व होते. माणसाचे मन अत्यंत अस्थिर असते.त्याची चंचलता कमी करण्यासाठी त्याला स्थिरत्व देऊन त्याच्यामधला विवेक विचार जागृत करण्याचा प्रयत्न सणवारांमधून केलेला असतो. होळी या सणातसुध्दा असेच एक मानवी मनाचे प्रतिबिंब पहायला मिळते.यादिवशी प्रज्वलित केली जाणारी होळी अनिष्ट विचारांना भस्मसात करण्याची शिकवण देते. काही ठिकाणी दहा तोंडी रावण करून त्याचे दहन करण्याचा प्रघात आहे. गावातल्या चौकाचौकात होणाऱ्या होळीच्या निमित्ताने एकमेकांच्या नावाने अगदी बोंबाबोंब जरी होत असली तरी त्यामध्येसुध्दा सामाजिक भान पाळण्याचे आवाहन केले गेले आहे. दुर्दैवाने अजूनही काही ठिकाणी त्याचा गैर अर्थ काढला जातो. आणि या सणाच्या मूळ हेतूला धक्का लावण्याचा प्रयत्न होतो.

### वाईटाविषयीचा असंतोष

होळी जळे आणि हिव पळे अशाप्रकारची म्हणही प्रचलित आहे. ऋतूमानातला बदल स्वाभाविकपणे जाणवायला लागतो. शिशिर ऋतू संपतो वसंत ऋतूचे आगमन होत असते.हिवाळा संपून उष्ण वारे वहायला लागतात. म्हणून त्याचा देखील विचार या सणाच्या निमित्ताने केला गेला. या काळामध्ये अगदी होळीला कोणता नैवेद्य दाखवायचा याचीसुध्दा योजना करून आहार आणि विहार याचा समन्वय साधला गेल्याचे पहायला मिळते. वर्षाच्या शेवटी येणारा हा सण गेल्या वर्षभरामध्ये झालेल्या गोष्टींचे विस्मरण करायला लावणारा आणि ज्याप्रमाणे वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते त्याप्रमाणे मानवी मनालाही उत्साहाचा नवा बहर आणणारा ठरतो. होळीच्या निमित्ताने पेटवला जाणारा अग्नी हे तेजाचे आणि त्यागाचे प्रतिक असते. मनुष्याच्या स्वभावामध्ये असलेल्या लोभ मोह अहंकाराचे किंवा द्वेष मत्सराचे दुर्गुण याच होळीच्या अग्नीमध्ये नाहीसे करावे.असा संदेश यानिमित्ताने दिला गेला आहे. प्रत्यक्षात तसे होते की, नाही हा भाग वेगळा परंतु मनामध्ये असलेली कटुता काढून टाकायची आणि एकमेकांविषयीचे प्रेम आदर याला पुन्हा तितकेच महत्त्वाचे स्थान द्यायचे. असा देखील या उत्सवामागचा हेतू आहे. पौराणिक कथांमध्ये होळीच्या अनेक कथा सांगितल्या जातात. त्या कथांपेक्षाही आताचे सामाजिक संदर्भ जास्त महत्त्वाचे मानले पाहिजेत. अगदी लहान मुलांना त्रास देणाऱ्या ढुंढा नामक राक्षशिणीला गावातून पळवून लावण्यासाठी जागोजागी अग्नी निर्माण करण्याची प्रथा पुराणांमधून सांगितली गेली आहे.भगवान शंकराला मोहग्रस्त करणाऱ्या कामाचे दहनसुध्दा यादिवशी करण्याचा उल्लेख पुराणांमध्ये सापडतो. प्रत्येक क्षेत्रामध्ये त्याचे स्वरूप आणि नावेही पहायला मिळतात. होळी, होलिका, हुताशनी पौर्णिमा किंवा श्रीकृष्णाला विषमय दूध पाजणाऱ्या पुतना राक्षशिणीचा मृत्यू याच दिवशी झाला. अशा विविध निमित्ताने होळीच्या माध्यमातून वाईट प्रवृत्तींविषयी समाजमनामध्ये चीड निर्माण करण्याचा या विषयी असंतोष व्यक्त करण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला असे मानायला भरपूर जागा आहे.

### सामाजिक ऐक्याचे दर्शन

अनेक वेळेला भारतीय सणांचे हे गुढ पाहिल्यानंतर आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. जगातल्या अनेक संस्कृतींपेक्षाही अतिशय वेगळ्या मार्गाने समाजाला एकत्र ठेवणारा आणि समाजमनाची काळजी घेणारा हा संस्कार किती मौल्यवान आहे, हे जाणवायला लागते होळीच्या दिवशी जातपंथ हे सगळे भेद बाजूला ठेवून अनेक स्वभावाची माणसे एकत्र येतात आणि आपल्या सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवतात ही गोष्ट देखील समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरते. अन्यथा आजच्या सगळ्या स्वार्थाने बरबटलेल्या युगात समाजात वैरभावना निर्माण व्हायला काहीच वेळ लागत नाही. पैसा अडका, जमीन जुमला अशा अनेक छोट्या छोट्या कारणांमुळे मनुष्य एकमेकांचा केव्हा वैरी होईल हे सांगता येत नाही. त्याच्या या सगळ्या वैरभावनेला होळीसारख्या छोट्याशा निमित्तातून काही काळासाठी का असेना थोपवण्याचे काम जर होत असेल तर त्याचे निश्चितच स्वागत केले पाहिजे किंबहुना अशा सणाचा अधिकाधिक चांगला उपयोग कसा होईल असा प्रयत्नही झाला पाहिजे. भारतीय संस्कृतीने नैवेद्य प्रसाद या सगळ्या माध्यमातून त्याला एक पावित्र्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. हे पावित्र्य जपण्याचे काम जर प्रत्येकाने प्रामाणिकपणे केले तर सरकारी कायद्यांपेक्षाही अशा प्रकारचे धार्मिक संस्कार आणि अनुशासन कितीतरी मोलाचे काम करून जाते हे लक्षात येईल. होळी हा सण अशाच समाजमनाचे भान जपणारा आहे.